# प्रसिद्धी विभाग

## शैक्षणिक वर्ष २०१६ – १७

## **साहेबरावजी बुट्टेपाटील स्मृती व्याख्यानमाला**



लोकमत पुणे, शनिवार, दि. २८ जानेवारी २०१७ ८

# युवाशक्तीमुळे भारत जगावर राज्य करेल

**अनिल बोकील : साहेबराव बुट्टे-पाटील स्मृती व्याख्यानमालेमध्ये संवाद**

जनप्रवास ५
गुरुवार, दि. २ फेब्रुवारी २०१७

# नोटाबंदीचा निर्णय देशाच्या अर्थव्यवस्थेसाठी गरजेचा : बोकील

राजगुरुनगर । वार्ताहर

समाजात वाढलेला काळा पैसा व काळ्या व्यवहारांमुळे वाढलेली महागाई व मुठभर लोकांच्या हाती जमा झालेला काळा पैसा त्यातच करचुकवेगिरीकडे वाढलेला लोकांचा कल यामुळे सरकार नावाची व्यवस्था गरीब झाली आहे. याशिवाय शेजारी देश आपल्या खोट्या नोटा छापून दहशतवादाचा करीत असलेला पुरस्कार या पार्श्वभूमीवर पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी पाचशे व हजार रुपयांच्या नोटबंदीचा घेतलेला निर्णय देशाच्या अर्थव्यवस्थेसाठी अत्यंत योग्य असल्याचे प्रतिपादन ज्येष्ठ अर्थतज्ञ अनिल बोकील यांनी केले.

हुतात्मा राजगुरु महाविद्यालयात आयोजित साहेबरावजी बुट्टेपाटील स्मृती व्याख्यानमालेत देशाला गरज एका






अर्थक्रांतीची या विषयावर ते बोलत होते. या प्रसंगी खेड तालुका शिक्षण प्रसारक मंडळाचे अध्यक्ष ॲड. देवेंद्र बुट्टेपाटील, उपाध्यक्ष नानासाहेब टाकळकर, संचालक शां. ल. घुमटकर, डॉ. अनिल खिवसरा, बाळासाहेब सांडभोर, सुशील शिंगवी, सुभाष टाकळकर, मुरलीधर खांडगे, अंकुश कोळेकर, ॲड. राजमाला बुट्टेपाटील, प्राचार्य डॉ. एस. बी. पाटील, उपप्राचार्य एच. पी. जाधव, पर्यवेक्षक प्रा. जी. जी. गायकवाड, कैलास पाचारणे, प्रा. अनिल कुलकर्णी आणि मोठ्या संख्येने ग्रामस्थ व विद्यार्थी उपस्थित होते. अनिल बोकील बोलताना पुढे म्हणाले की, नोटबंदीमुळेदेशातील सर्व पैसा बँकेच्या माध्यमातून पुन्हा चलनात येणार आहे. कॅशलेस व्यवहारामुळे भ्रष्टाचाराला आळा बसेल. लोकांनाही प्रामाणिकपणे कर भरणा करावा लागणार आहे. त्यामुळे पंतप्रधानांनी घेतलेला हा निर्णय हा अर्थव्यवस्थेच्या स्वच्छतेचा भाग असून त्यामुळे देशाच्या विकासासाठी हातभार लागण्यास मदत होणार आहे. या निर्णयाचे दृश्य परिणाम दिसण्यासाठी काही वेळ द्यावा लागेल असे त्यांनी सांगितले. आपली अर्थव्यवस्था कृषीसंस्कृतीवर आधारित असल्याने गावगाड्यात विनिमयाचे साधन असलेल्या धान्याचे शेतकरी उत्पादन करायचा. जागतिकीकरणामुळे आलेल्या औद्योगिक संस्कृतीने कृषी अर्थव्यवस्था मोडकळीस आली. उत्पादनाचा संबंध पैशाशी आल्याने शेतमालाला भाव मिळेनासा झाला. त्यातून शेतकरी देशोधडीला लागला. शेतकऱ्यांना कमी व्याजदराने कर्ज उपलब्ध होण्यासाठी सर्व पैसा चलनात येण्याची गरज त्यांनी व्यक्त केली.

आजच्या तरुणांना आरक्षण हवं की भांडवल असा प्रश्न उपस्थित करून त्यांनी तरुणांना विकासाच्या संधी हव्या असतील तर नोकरीच्या मागे न लागता कमी व्याजदराने भांडवल उपलब्ध करून देऊन तरुणांना उद्योग व्यवसायाला लावण्याची गरज व्यक्त केली. तरुणांनी प्रश्नांची मांडणी न करता उत्तराची मांडणी करायला हवी, असेही त्यांनी सांगितले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा. व्ही. बी. दौंडकर यांनी केले. परिचय डॉ. राजेंद्र शिरसी यांनी केले तर आभार कोमल गायकवाड यांनी मानले.

ग्रामीण संध्या
मंगळवार, दि. ३१ जानेवारी २०१७ ७

# नोटबंदीचा निर्णय देशाच्या अर्थव्यवस्थेच्या फायद्याचा : बोकील

राजगुरुनगर : (किरण खुडे) : समाजात वाढलेला काळा पैसा व काळ्या व्यवहारांमुळे वाढलेली महागाई व मुठभर लोकांच्या हाती जमा झालेला काळा पैसा त्यातच करचुकवेगिरीकडे वाढलेला लोकांचा कल, यामुळे सरकार नावाची व्यवस्था गरीब झाली आहे. याशिवाय शेजारी देश आपल्या खोट्या नोटा छापून दहशतवादाचा करीत असलेला पुरस्कार या पार्श्वभूमीवर पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी पाचशे व हजार रुपयांच्या नोटबंदीचा घेतलेला निर्णय देशाच्या अर्थव्यवस्थेसाठी अत्यंत योग्य असल्याचे प्रतिपादन ज्येष्ठ अर्थतज्ज्ञ अनिल बोकील यांनी केले.

हुतात्मा राजगुरु महाविद्यालयात आयोजित साहेबरावजी बुट्टेपाटील स्मृती व्याख्यानमालेत देशाला गरज एका अर्थक्रांतीची या विषयावर ते बोलत होते. याप्रसंगी खेड तालुका शिक्षण प्रसारक मंडळाचे अध्यक्ष ॲड. देवेंद्र बुट्टेपाटील, उपाध्यक्ष नानासाहेब टाकळकर, संचालक शां. ल. घुमटकर, डॉ. अनिल खिवसरा, बाळासाहेब सांडभोर, सुशील शिंगवी, सुभाष टाकळकर, मुरलीधर खांडगे, अंकुश कोळेकर, ॲड. राजमाला बुट्टेपाटील, प्राचार्य डॉ. एस. बी. पाटील, उपप्राचार्य एच. पी. जाधव, पर्यवेक्षक प्रा. जी. जी. गायकवाड, प्रबंधक कैलास पाचारणे, प्रा. अनिल कुलकर्णी आणि मोठ्या संख्येने ग्रामस्थ व विद्यार्थी उपस्थित होते.




अनिल बोकील बोलताना पुढे म्हणाले की, नोटबंदीमुळे देशातील सर्व पैसा बँकेच्या माध्यमातून पुन्हा चलनात येणार आहे. कॅशलेस व्यवहारामुळे भ्रष्टाचाराला आळा बसेल. लोकांनाही प्रामाणिकपणे कर भरणा करावा लागणार आहे. त्यामुळे पंतप्रधानांनी घेतलेला हा निर्णय हा अर्थव्यवस्थेच्या स्वच्छतेचा भाग असून, त्यामुळे देशाच्या विकासासाठी हातभार लागण्यास मदत होणार आहे. या निर्णयाचे दृश्य परिणाम दिसण्यासाठी काही वेळ द्यावा लागेल, असे त्यांनी सांगितले.

आपली अर्थव्यवस्था कृषीसंस्कृतीवर आधारित असल्याने गावगाड्यात विनिमयाचे साधन असलेल्या धान्याचे शेतकरी उत्पादन करायचा. जागतिकीकरणामुळे आलेल्या औद्योगिक संस्कृतीने कृषी अर्थव्यवस्था मोडकळीस आली. उत्पादनाचा संबंध पैशाशी आल्याने शेतमालाला भाव मिळेनासा झाला. त्यातून शेतकरी देशोधडीला लागला. शेतकऱ्यांना कमी व्याजदराने कर्ज उपलब्ध होण्यासाठी सर्व पैसा चलनात येण्याची गरज त्यांनी व्यक्त केली. आजच्या तरुणांना आरक्षण हवं की भांडवल असा प्रश्न उपस्थित करून त्यांनी तरुणांना विकासाच्या संधी हव्या असतील, तर नोकरीच्या मागे न लागता कमी व्याजदराने भांडवल उपलब्ध करून देऊन तरुणांना उद्योग व्यवसायाला लावण्याची गरज व्यक्त केली. तरुणांनी प्रश्नांची मांडणी न करता उत्तराची मांडणी करायला हवी, असेही त्यांनी सांगितले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा. व्ही. बी. दौंडकर यांनी केले. परिचय डॉ. राजेंद्र शिरसी यांनी केले, तर आभार कोमल गायकवाड यांनी मानले.

# नोटबंदीचा निर्णय अर्थव्यवस्थेसाठी योग्य

## अनिल बोकील : 'गरज एका अर्थक्रांतीची' या विषयावर राजगुरुनगरला मार्गदर्शन

राजगुरुनगर, दि. २८ (प्रतिनिधी) - समाजात वाढलेला काळा पैसा व काळ्या व्यवहारांमुळे वाढलेली महागाई व मूठभर लोकांच्या हाती जमा झालेला काळा पैसा त्यातच करचुकवेगिरीकडे वाढलेला लोकांचा कल. यामुळे सरकार नावाची व्यवस्था गरीब झाली आहे. याशिवाय शेजारी देश आपल्या खोट्या नोटा छापून दहशतवादाला करीत असलेला पुरस्कार या पार्श्वभूमीवर पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी पाचशे व हजार रुपयांच्या नोटबंदीचा घेतलेला निर्णय देशाच्या अर्थव्यवस्थेसाठी अत्यंत योग्य असल्याचे प्रतिपादन ज्येष्ठ अर्थतज्ज्ञ अनिल बोकील यांनी केले.

येथील हुतात्मा राजगुरू महाविद्यालयात आयोजित साहेबरावजी बुट्टेपाटील स्मृती व्याख्यानमालेत देशाला गरज एका अर्थक्रांतीची या विषयावर बोलत होते. या प्रसंगी खेड तालुका शिक्षण प्रसारक मंडळाचे अध्यक्ष ॲड. देवेंद्र बुट्टेपाटील, उपाध्यक्ष नानासाहेब टाकळकर, मानद सचिव हरिभाऊशेठ सांडभोर, संचालक शां. ह. घुमटकर, डॉ. अनिल खिस्ती, बाळासाहेब सांडभोर, सुशील शिंगवी, सुभाष टाकळकर, मुरलीधर खांडगे, अंकुश कोळेकर,



राजगुरुनगर : बुट्टेपाटील स्मृती व्याख्यानमालेत 'देशाला गरज एका अर्थक्रांतीची' च्या विषयावरील विचार ऐकण्यासाठी झालेली गर्दी. (इन्सेटमध्ये) मार्गदर्शन करताना ज्येष्ठ अर्थतज्ज्ञ अनिल बोकील.

### सर्व पैसा बँकेच्या माध्यमातून पुन्हा चलनात येणार

ॲड. राजमाला बुट्टेपाटील, प्राचार्य डॉ. एस. बी. पाटील, उपप्राचार्य एस. पी. जाधव, पर्यवेक्षक प्रा. जी. जी. गायकवाड, प्रबंधक कैलास पाचारणे, प्रा. अनिल कुलकर्णी आणि मोठ्या संख्येने ग्रामस्थ व विद्यार्थी उपस्थित होते.

अनिल बोकील म्हणाले, नोटबंदीमुळे देशातील सर्व पैसा बँकेच्या माध्यमातून पुन्हा चलनात येणार आहे. कॅशलेस व्यवहारामुळे भ्रष्टाचाराला आळा बसेल. लोकांनाही प्रामाणिकपणे करभरणा

### औद्योगिक संस्कृतीने कृषी अर्थव्यवस्था मोडकळीस

करावा लागणार आहे. त्यामुळे पंतप्रधानांनी घेतलेला हा निर्णय हा अर्थव्यवस्थेच्या स्वच्छतेचा भाग असून त्यामुळे देशाच्या विकासासाठी हातभार लागण्यास मदत होणार आहे. या निर्णयाचे दृश्य परिणाम दिसण्यासाठी काही वेळ द्यावा लागेल, असे त्यांनी सांगितले. आपली अर्थव्यवस्था कृषीसंस्कृतीवर आधारित असल्याने पारंपरिक विनिमयाचे साधन असलेल्या धान्याचे शेतकरी उत्पादन करायचा. जागतिकीकरणामुळे आलेल्या औद्योगिक संस्कृतीने कृषी अर्थव्यवस्था मोडकळीस आली.

उत्पादनाचा संबंध पैशाशी आल्याने शेतमालाला भाव मिळेनासा झाला. त्यातून शेतकरी देशोधडीला लागला. शेतकऱ्यांना कमी व्याजदराने कर्ज उपलब्ध होण्यासाठी सर्व पैसा चलनात येण्याची गरज त्यांनी व्यक्त केली. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा. व्ही. बी. दौंडकर यांनी केले. परिचय डॉ. राजेंद्र शिरसी यांनी केले तर कोमल गायकवाड हिने आभार मानले.


### नोकरीच्या मागे लागू नका

आजच्या तरुणांना आरक्षण हवं की भांडवल, असा प्रश्न अनिल बोकील यांनी उपस्थित केला. ते म्हणाले की, तरुणांना विकासाच्या संधी हव्या असतील तर नोकरीच्या मागे न लागता कमी व्याजदराने भांडवल उपलब्ध करून देऊन तरुणांना उद्योग व्यवसायाला लावण्याची गरज आहे. तरुणांनी प्रश्नांची मांडणी न करता उत्तराची मांडणी करायला हवी, असेही त्यांनी सांगितले.



# भ्रष्टाचारामुळे पैसा मधेच मुरला : बोकील

सकाळ वृत्तसेवा



अनिल बोकील

राजगुरुनगर, ता. २९ : "पैसा हा माध्यम होऊन वापरला जाण्याऐवजी वस्तू होऊन साठविला जाऊ लागला आणि सरकारकडे जाण्याऐवजी भ्रष्टाचारामुळे मधल्या मधेच मुरला जाऊ लागला म्हणून भारताची अर्थव्यवस्था अडचणीत आली. त्यासाठी नोटाबंदी म्हणजेच विमुद्रीकरणाची गरज होती. विमुद्रीकरण ही केवळ एक घटना नसून प्रक्रिया असल्याने तिचे परिणाम लगेच दिसणार नाहीत. त्यामुळे काही काळानंतरच त्याची मीमांसा करावी लागेल," असे प्रतिपादन अर्थतज्ज्ञ आणि अर्थक्रांती प्रतिष्ठानचे अनिल बोकील यांनी केले.

### .... म्हणून शेतकरी आत्महत्या करू लागला

"जोपर्यंत विनिमयाचे साधन धान्य होते, तोपर्यंत शेतकरी राजा होता. जागतिकीकरणातून युरोपीय संस्कृतीने भारतात पैसा आणल्याने शेतकऱ्यांऐवजी बँका राजा बनल्या. तरी आपण जगाचे पोट भरतो म्हणून शेतकऱ्याला प्रतिष्ठा होती; पण उत्पादनाचा संबंध पैशाशी आल्याने त्याची प्रतिष्ठाही संपली आणि तो आत्महत्या करू लागला," असेही ते म्हणाले.

येथील हुतात्मा राजगुरु महाविद्यालयात आयोजित साहेबरावजी बुट्टेपाटील स्मृती व्याख्यानमालेत शुक्रवारी (ता. २७) दुसरे पुष्प गुंफताना 'देशाला गरज एका अर्थक्रांतीची' या विषयावर बोकील बोलत होते.

ते म्हणाले, "नोटांच्या स्वरूपात पैसा व्यवहारातून बाजूला साठवून ठेवला की तो सरकारपर्यंत जात नाही. शेतकऱ्यांचे, कामगारांचे श्रममूल्य, बाजारमूल्य गोठून जाते. पैसा शेतकऱ्यांपर्यंत, उद्योजकांपर्यंत, विद्यार्थ्यांपर्यंत पोचत नाही.

तसेच ग्राहकाची क्रयशक्ती कमी होते. परिणामी राष्ट्रीय संपत्तीत वाढ होत नाही. त्यामुळे सरकार नावाची व्यवस्था दरिद्री झाली आहे. म्हणून सार्वजनिक व्यवस्थेत नोट गेली पाहिजे, कारण पैसा ही सार्वजनिक गोष्ट आहे, ती व्यक्तिगत नव्हे.

ती सार्वजनिक व्यवहारात फिरला तर कर्जाचे दर कमी होतील. आजच्या दराने जे कर्ज फेडायला वीस वर्षे लागतात, ते कर्ज दोन टक्क्यांवर आले, तर साडेआठ वर्षांत फिटेल. कर्जफेडीच्या वाचलेल्या वर्षांमधून दुप्पट किंमत तयार होईल.

देशात भांडवल तयार होत नाही म्हणून आपण योग्य जगणे न जगता, परवडणारे जगणे जगत आहोत. भारतात फक्त तीन कोटी नोकऱ्या आहेत, नोकऱ्यांना मर्यादा आहेत. म्हणून साहित्य आणि संसाधन निर्माण होणे गरजेचे आहे. अर्थशास्त्र हा पैशाचा नाही, तर संसाधनांचा विषय आहे."

डॉ. राजेंद्र शिरसी यांनी प्रास्ताविक, तर प्रा. व्ही. बी. दौंडकर यांनी सूत्रसंचालन केले. कोमल गायकवाड हिने आभार मानले.



केसरी पुणे, ३० जानेवारी २०१७ ३

# नोटबंदी अर्थव्यवस्थेसाठी गरजेची

## ज्येष्ठ अर्थतज्ज्ञ अनिल बोकील यांचे प्रतिपादन

राजगुरुनगर, (वार्ताहर) : समाजात वाढलेला काळा पैसा व काळ्या व्यवहारांमुळे वाढलेली महागाई व मुठभर लोकांच्या हाती काळा पैसा जमा झाला आहे. करचुकवेगिरीकडे लोकांचा कल वाढल्यामुळे सरकार नावाची व्यवस्था गरीब झाली आहे. तसेच शेजारचे देश आपल्या खोट्या नोटा छापून दहशतवादाचा करीत असलेला पुरस्कार या पार्श्वभूमीवर पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी घेतलेला नोटा बंदीचा निर्णय देशाच्या अर्थव्यवस्थेसाठी अत्यंत योग्य असल्याचे प्रतिपादन ज्येष्ठ अर्थतज्ज्ञ अनिल बोकील यांनी केले.

हुतात्मा राजगुरू महाविद्यालयात आयोजित साहेबरावजी बुट्टेपाटील स्मृती व्याख्यानमालेत 'देशाला गरज एका अर्थक्रांतीची' या विषयावर ते बोलत होते. याप्रसंगी खेड तालुका शिक्षण प्रसारक मंडळाचे अध्यक्ष ॲड. देवेंद्र बुट्टेपाटील, उपाध्यक्ष नानासाहेब टाकळकर, संचालक शां. ल. पुनटकर, डॉ. अनिल खिवसरा, बाळासाहेब सांडभोर, सुशील शिंगवी, सुभाष टाकळकर, मुरलीधर खांडगे, अंकुश कोळेकर, ॲड. राजमाला बुट्टेपाटील, प्राचार्य डॉ. एस. बी. पाटील, उपप्राचार्य एच. पी. जाधव, पर्यवेक्षक प्रा. जी. जी. गायकवाड, प्रबंधक कैलास पाचारणे, प्रा. अनिल कुलकर्णी आणि मोठ्या संख्येने ग्रामस्थ व विद्यार्थी उपस्थित होते.

बोकील बोलताना पुढे म्हणाले की, नोटबंदीमुळे देशातील सर्व पैसा बँकेच्या माध्यमातून पुन्हा चलनात येणार आहे. कॅशलेस व्यवहारामुळे भ्रष्टाचाराला आळा बसेल. लोकांनाही प्रामाणिकपणे कर भरणा करावा लागणार आहे. त्यामुळे पंतप्रधानांनी घेतलेला हा निर्णय हा अर्थव्यवस्थेच्या स्वच्छतेचा भाग असून त्यामुळे देशाच्या विकासासाठी हातभार लागण्यास मदत होणार आहे. या निर्णयाचे दृश्य परिणाम दिसण्यासाठी काही वेळ द्यावा लागेल असे त्यांनी सांगितले.

आपली अर्थव्यवस्था कृषी संस्कृतीवर आधारित असल्याने गावगाड्यात विनिमयाचे साधन असलेल्या धान्याचे शेतकरी उत्पादन करायचा. जागतिकीकरणामुळे आलेल्या औद्योगिक संस्कृतीने कृषी अर्थव्यवस्था मोडकळीस आली. उत्पादनाचा संबंध पैशाशी आल्याने शेतमालाला भाव मिळेनासा झाला. त्यातून शेतकरी देशोधडीला लागला. शेतकऱ्यांना कमी व्याजदराने कर्ज उपलब्ध होण्यासाठी सर्व पैसा चलनात येण्याची गरज त्यांनी व्यक्त केली.

आजच्या तरुणांना आरक्षण हवे की भांडवल असा प्रश्न उपस्थित करून त्यांनी तरुणांना विकासाच्या संधी हव्या असतील तर नोकरीच्या मागे न लागता कमी व्याजदराने भांडवल उपलब्ध करून देऊन तरुणांना उद्योग व्यवसायाला लावण्याची गरज व्यक्त केली.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा. व्ही. बी. दौंडकर यांनी केले. परिचय डॉ. राजेंद्र शिरसी यांनी केले तर आभार कोमल गायकवाड यांनी मानले.

डॉ. संजय शिंदे

प्रसिद्धी विभाग प्रमुख